	कार्यालय :- सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा.	
	प्रशासकिय इमारत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, सिव्हील लाईन, वर्धा- ४४२००१	
	दुरध्वनी क्र.०७१५२-२४३८८९/२४३२११ Email ID- dyceogenzpwardha@gmail.com	स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पत्र क्र./जिपव/साप्रवि/मा.अ./स्था-4/वशि- 134/2026 दिनांक :- 02/03/2026.

प्रति,

मा. विभागीय आयुक्त,
नागपुर विभाग, नागपुर

विषय :- सन 2026 चे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधिल कलम ४ नुसार 1 ते 17 मुद्यांचे मॅन्युअल पुस्तिका प्रकाशित करण्याबाबत.

संदर्भ :- 1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संकिर्ण-2011/पत्रक्र-180/समन्वय कक्ष, दिनांक- 14 ऑक्टो. 2011.
2) आपले पत्र क्र. विशा/कार्या-11(5) 1329/2015 दिनांक- 26/11/2015.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सादर करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा चे माहितीचा अधिकार अधिनियम- 2005 अंतर्गत कलम ४ नुसार जानेवारी- 2026 चे स्थिती नुसार 1 ते 17 मुद्यांचे म्यॅन्युअल पुस्तिका तयार करुन जिल्हा परिषद, वर्धा चे वेब साईट zpwardha.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात आले आहे.

सबब माहिती करिता 17 मुद्यांचे म्यॅन्युअल पुस्तिका यासोबत आपणाकडे सादर करण्यात येत आहे.

सहपत्र:- सन २०२६ चे १ ते १७ मुद्यांचे म्यॅन्युअल.

(अमोल भोसले)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.)
जिल्हा परिषद, वर्धा.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
जिल्हा परिषद, वर्धा

प्रतिलिपी :- मा. कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती करिता सविनय सादर.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा पारिषद, वर्धा.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
जिल्हा परिषद, वर्धा

(1)

सामान्य प्रशासन विभाग

जिल्हा परिषद, वर्धा

माहिती अधिकारी-२००५

कलम ४ नुसार १ ते १७ मॅन्युअल

जानेवारी- २०२६

सामान्य प्रशासन विभाग



माहितीचा अधिकार अधिनियम २००५

जिल्हा परिषदेच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता, खरेपणा व जबाबदारीची जाणीव आणणे आणि लोकशाही समाजव्यवस्थेत जनतेचा प्रभावी सहभाग असणे यासाठी माहितीचा अधिकार महत्वाचा आहे. माहितीचा अधिकार हा लोकशाहीचा पाया असून शासनाच्या कारभारात पारदर्शकता आणण्याकरिता व जबाबदार प्रशासन तयार करण्याकरिता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा दिनांक २२ डिसेंबर, २००५ पासुन जम्मू व काश्मीर वगळता संपूर्ण भारतास लागू करण्यात आला आहे.

सर्वसामान्य नागरिकास हवी असलेली शासकीय माहिती वेळेत मिळावी व प्रशासनामध्ये गतिमानतेबरोबरच पारदर्शकता यावी या उद्देशाने माहितीचा अधिकार महत्वपूर्ण ठरणार आहे. माहितीचा अधिकार या अधिनियमात ३० दिवसांच्या आत सबंधित व्यक्तीस माहिती पुरविणे बंधनकारक करण्यात आले आहे. हि माहिती विहित कालावधीत न दिल्यास सबंधित शासकीय माहिती अधिका-यास प्रत्येक दिवसाकरिता रु. २५०/- एवढया दंडाची तरतुद या अधिनियमात करण्यात आली आहे. चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती दिल्यास अथवा सदोष व अपूर्ण माहिती दिल्यास २५,०००/- रुपये पर्यत दंडात्मक शिक्षा व शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

माहिती मिळवण्याची कार्यपध्दती :-

अपेक्षित असलेली माहिती मिळविण्यासाठी इच्छुक असलेल्या व्यक्तीने विहीत करण्यात आलेल्या शुक्लासह व विहित नमुन्यात आवश्यक असलेल्या माहितीच्या तपशिलासह शासकीय माहिती अधिका-याकडे अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा कामाच्या दिवसात ती माहिती सबंधित अर्जदारास पुरवावयची आहे. योग्य प्रकरणांमध्ये ही कालमर्यादा कारणे नमूद करुन आणि अर्जदाराला ती कळवून आणखी पंधरा दिवसांनी वाढविता येईल.

अशी माहिती देता येणार नाही :-

देशाचे सार्वभौमत्व व एकात्मता, राज्याची सुरक्षितता किंवा हित, विदेशी राज्याशी असलेले संबंध यावर बाधकरित्या परिणामकारक होईल किंवा एखाद्या अपराधास चिथावणी मिळेल अशी माहिती देण्यात येणार नाही. जी माहिती प्रसिध्द करण्यास कोणत्याही न्यायालयाकडून किंवा न्यायाधिकरणाकडून स्पष्टपणे मनाई करण्यात आली असेल किंवा उघड करण्याने न्यायालयाचा अवमान होत असेल अशी माहिती देण्यात येणार नाही.

अपील करण्याची पध्दती :-

जन माहिती अधिका-याने माहितीची विनंती फेटाळली असेल तर अर्ज करणा-या व्यक्तीस विहित नमुन्यात वीस रुपये न्यायालय फी मुद्रांक चिकटवून आदेशाच्या प्रतीसह संबंधित अपील प्राधिका-याकडे करता येईल. माहितीची विनंती फेटाळल्याचा आदेश माहिती अधिका-याकडून मिळाल्यानंतर ३० दिवसाच्या आत प्राधिका-याकडे अपील करता येणार आहे. अपील प्राधिका-याकडे दिलेला आदेश संबंधित अपीलकाराला कळविण्यात येईल आणि ज्याच्या आदेशाविरुध्द अपील दाखल केले असेल अशा जन माहिती अधिका-यास कळविण्यात येईल. अपील प्राधिका-याकडूनही माहितीची विनंती करणा-या नागरिकाचे समाधान झाले नाही तर त्यास विहित नमुन्यात विहित शुल्कासह अपील प्राधिका-याच्या आदेशाच्या प्रतिसह लोकआयुक्तांकडे अपील करता येईल. लोकआयुक्तांचा अपिलावरील निर्णय अंतिम असेल.

जोडपत्र अ

(नियम ३ पहा)

येथे रु. १० चा न्यायालय
फी मुद्रांक चिकटवावा.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठीच्या अर्जाचा नमुना

प्रति,

(१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :- ----------

(२) पत्ता :- ----------

---

(३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :----------

(एक) माहिती विषय :- ----------

(दोन) ज्या कालावधी संबंधात माहिती
हवी असेल तो कालावधी :- ----------

(तीन) हव्या असलेल्या माहितीचे वर्णन :- ----------

(चार) माहिती टपालाद्वारे हवी आहे किंवा व्यक्तीश :- ----------
हवी आहे :- ----------
(प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त
फीमध्ये समाविष्ट करण्यात येईल)

(पाच) टपालाद्वारे हवी असल्यास :- ----------
(सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)

(४) अर्जदार दारिद्ररेषेखालील आहे किंवा कसे :- ----------
(असल्यास, त्याबाबतच्या पुराव्याची छायांकित प्रत जोडावी).

ठिकाण :-

दिनांक :-

(अर्जदाराची स्वाक्षरी)

जोडपत्र ब

[(नियम ५ (१) पहा)]

येथे रु. २० चा न्यायालय
फी मुद्रांक चिकटवावा.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) खालील अपील

प्रेषक ----------

(अपिलकाराचे नाव आणि पत्ता)

प्रति ----------

(अपील प्राधिका-याचे नाव / पदनाम / पत्ता)

(१) अपीलकाराचे संपूर्ण नांव :- ----------

(२) पत्ता :- ----------

(३) राज्य जन माहिती अधिका-याचा तपशिल :----------

(४) ज्या आदेशाच्या विरुध्द अपील केले आहे
तो आदेश मिळाल्याचा दिनांक :- ----------
(आदेश काढला असल्यास)

(५) अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक :- ----------

(६) अपिलाची कारणे :- ----------

(७) माहितीचा तपशील :----------

(एक) हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय :- ----------

(दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी सबंधित
आहे त्याचे नांव :----------

ठिकाण :-

दिनांक :-

अपीलकाराची स्वाक्षरी

जोडपत्र क

[(नियम ५ (२) पहा)]

येथे रु. २० चा न्यायालय
फी मुद्रांक चिकटवावा.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) खालील अपील

प्रेषक ----------

(अपिलकाराचे नाव आणि पत्ता)

प्रति ----------

(१) अपीलकाराचे संपूर्ण नांव :- ----------

(२) पत्ता :- ----------

(३) राज्य जन माहिती अधिका-याचा तपशिल :- ----------

(४) पहिल्या अपील प्राधिका-याचा तपशील :- ----------

(५) ज्या आदेशाच्या विरुध्द अपील केले आहे
तो आदेश मिळाल्याचा दिनांक :- ----------

(६) अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक :- ----------

(७) अपिलाची कारणे :- ----------

(८) माहितीचा तपशील :- ----------

(एक) हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय :- ----------

(दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी सबंधित
आहे त्याचे नांव :- ----------

ठिकाण :-

दिनांक :-

अपीलकाराची स्वाक्षरी
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,
शासनाचे प्रधान सचिव,

सदयस्थिती प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा

सामान्य प्रशासन विभाग

मॅन्युअल्स क्रमांक :- १
आपली रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशिल.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मध्ये जिल्हा परिषद , जिल्हा परिषदे अंतर्गत येणारी स्थायी समिती व विषय समित्या व पंचायत समितीचे अधिकार व कर्तव्य दिलेले आहेत.

*** जिल्हा परिषेचे अधिकार व कर्तव्य ***

१. जिल्हा यादीतील विषयांसाठी जिल्हा निधीतुन तरतूद करणे आणि या यादीतील विषयांशी संबंधित असलेली बांधकामे किंवा विकास योजनांना मंजूरी देणे त्यापैकी काही कृषि , पीकसंरक्षण व गोदामे, पशुसंवर्धन, वन, समाजकल्याण, शिक्षण, आरोग्य, बांधकाम, आरोग्य अभियांत्रिकी हया आहेत.

२. जिल्हा परिषदेला जिल्हयातील रहीवाश्यांचे आरोग्य, सुरक्षितता, शिक्षण किंवा त्यांचे सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिक कल्याण होईल असे इतर कोणतेही काम किंवा उपाय योजना जिल्हयात अंमलात आणण्यासाठी तरतुद करता येईल.

३. स्थायी व विषय समित्यांकडून अहवाल व हिशेब मागविणे.

४. कोणत्याही कामासबंधाने सबंधित अधिकारी व कर्मचारी याचा सल्ला घेण्यास फर्मावता येईल.

५. स्थानिक साधन संपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करुन जिल्हयाचा योजनाबध्द विकास करण्यास करण्याचा प्रयत्न करणे आणि वार्षिक व दिर्घ मुदतीच्या योजना तयार करणे.

६. अनुसूचित जाती आणि जमाती आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेले वर्ग किंवा परिस्थिती सुधारण्यासाठी उपाय योजनांची अंमल बजावणी करणे, अस्पृश्यतेचे निवारण करणे आणि त्यासाठी पुरेशा रकमांची तरतूद करणे.

७. जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यास किंवा स्थायी समिती किंवा विषय समितीच्या सदस्यास प्रवासासाठी खर्च देण्यासाठी तरतूद करणे.

८. जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यावर प्रशासनिक नियंत्रण ठेवणे.

*** अर्थविषयक अधिकार ***

१. पंचायत समिती कार्यक्षेत्रात बांधकाम व विकासाच्या योजनांच्या अंमलबजावणीकरीता दरवर्षी अनुदान देणे.

२. बांधकाम व विकास योजना कामांचा अंदाजित अनावर्ती खर्च रुपये दहा लाखापेक्षा जास्त व आवर्ती खर्च रुपये एक लाखापेक्षा जास्त होत असेल तर त्यास मंजूरी देणे.

३. बांधकाम किंवा विकास योजनेच्या दहा लाखापेक्षा जास्त असलेल्या अंदाजित अनावर्ती खर्चाच्या निविदा स्विकारण्यास मंजूरी देणे.

४. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचे आणि खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे आणि विहीत मुदतीत त्यास मंजूरी देणे.

५. जिल्हा परिषदेचे सुधारीत किंवा पुरक अंदाजपत्रक तयार करवून घेणे आणि त्यास मंजूरी देणे.

६. पंचायत समितीच्या जमा खर्चाच्या हिशेबास किंवा अंदाजपत्रकास विहीत मुदतीत पंचायत समितीने मंजूरी न दिल्यास त्यास मंजूरी देणे.

७. बांधकामाची किंवा विकास योजनेची प्रशासकीय मान्यता अनावर्तीत खर्चाची रक्कम २५,००,०००/- पेक्षा जास्त असेल आणि आवर्ती खर्च रुपये ५,००,०००/- पेक्षा जास्त असेल तर त्यास मंजुरी देईल. रुपये २५,००,०००/- पेक्षा जास्त असलेल्या अनावर्ती खर्चाची निविदा स्विकारण्यास मंजुरी देईल.

*** दुष्काळात जिल्हा परिषदेची कर्तव्ये ***

राज्य शासनाने कोणतेही क्षेत्र टंचाईचे क्षेत्र म्हणून जाहीर केले असेल आणि जमीन महसूल तहकुब केला असेल किंवा त्यात सुट दिली असेल किंवा कोणत्याही क्षेत्रात पुरामुळे किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे बिकट स्थिती निर्माण झाली असेल तर अशा क्षेत्रात सहाय्य देण्याची कामे हाती घेणे हे जिल्हा परिषदेचे कर्तव्य आहे.

*** जिल्हा परिषदेकडे बांधकाम व विकास योजना हस्तांतरीत करणे ***

राज्य शासन जिल्हा परिषदेच्या संमतीने जिल्हयातील रहिवाश्यांच्या कल्याणासाठी सहाय्यभूत ठरणा-या कोणत्याही बांधकामाच्या किंवा विकास योजनेच्या अंमलबजावणीचे काम जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करेल. त्यानंतर जिल्हा परिषदेने अशा हस्तांतरीत बांधकामाची किंवा विकास योजनेची अमलबजावणी करणे विधिसंगत ठरेल.

*** जिल्हा परिषदेचा इतर बांधकामे करण्याचा अधिकार ***

केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या वतीने विहीत शर्तीवर जिल्हा परिषदेने कोणतेही बांधकाम करणे, ते सुस्थितीत ठेवणे व त्यांची दुरुस्ती करणे किंवा कोणत्याही संस्थेची व्यवस्था पाहणे हे विधीसंमत आहे. स्थानिक प्राधिकरण व जिल्हा परिषद यांच्यात करार झाल्या नुसार जिल्हा परिषद तांत्रिक मार्गदर्शन करेल व त्या प्रयोजना करिता जिल परिषदेच्या कोणत्याही अधिका-यास किंवा कर्मचा-यास अशा कोणत्याही बांधकामाची किंवा योजनेची तपासणी करता येईल.

*** पंचायत समितीचे अधिकार व कर्तव्ये ***

१. प्रत्येक पंचायत समिती आपल्या गटात हाती घ्यावयाच्या बांधकामाचा व विकास योजनांचा एक संपूर्ण आराखडा तयार करेल .गटातील स्थानिक साधन संपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्याच्या दृष्टिने असा आराखडा तयार केला जाईल. गट अनुदानातून कोणत्याही बांधकामास किंवा विकास योजनेस पंचायत समिती मंजुरी देईल. त्याची अंमलबजावणी करेल व त्यावर देखरेख ठेवेल.
२. जिल्हा परिषदेची बांधकामे व विकास योजना पंचायत समिती अंमलात आणिल . त्या सुस्थितीत ठेविल आणि त्यावर देखरेख ठेवेल. जिल्हा परिषदेने सोपविलेले काम गटात पार पाडेल.
३. गटात बसविण्यात आलेल्या करात किंवा फी मध्ये वाढ करण्याबाबत जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठविता येईल.
४. जिल्हा परिषदेकडून देण्यात आलेल्या सूचनेनुसार पंचायत समिती आपली कार्ये व कर्तव्ये पार पाडेल.
५. सभापती व उपसभापती यांना एका वर्षात ३० दिवसाहून जास्त परंतु ९० दिवसाहून जास्त होणार नाही एवढी अनुपस्थिती रजा मंजुर करेल.
६. प्रत्येकी तीन महिन्यांनी सभांच्या कार्यक्रमांचा गोषवारा जिल्हा परिषदेकडे पाठविणे हे पंचायत समितीचे कार्य आहे.
७. प्रशासकीय अहवाल तयार करेल आणि तो जिल्हा परिषदेकडे पाठवेल.

*** अर्थ विषयक अधिकार ***

१. **बांधकामाची किंवा विकास योजनेची प्रशासकीय मान्यता अनावर्तीत खर्चाची रक्कम ५,००,०००/- पेक्षा जास्त असेल आणि आवर्ती खर्च रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असेल तर त्यास मंजुरी देईल.**
२. रुपये ५,००,०००/- पेक्षा जास्त असलेल्या अनावर्ती खर्चाची निविदा स्विकारण्यास मंजुरी देईल.
३. दरवर्षी उत्पन्नाचे आणि खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन ते विहित मुदतीत मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविल.
४. गट विकास अधिका-याने तयार केलेला हिशोब विचारत घेऊन तो अर्थ समितीच्या अहवालासह जिल्हा परिषदेकडे तो विहित मुदतीत मंजुरीसाठी पाठवेल.

*** स्थायी समिती व विषय समित्यांचे अधिकार व कर्तव्य ***

सर्वसाधारण अधिकार :-

१. स्थायी समिती किंवा विषय समिती तिच्याकडे नेमून दिलेल्या विषयांच्या संदर्भात असलेली बांधकामे आणि विकास योजना यांचा प्रभाग स्वत:कडे घेईल.

२. बांधकामे आणि विकास योजना यांच्या अमलबजावणीवर देखरेख ठेवेल. अंदापत्रकात केलेल्या तरतूदीच्या खर्चावर देखरेख ठेवेल

३. बांधकामाच्या आणि विकास योजनांच्या प्रगतीचे नियमितपणे पुनर्विलोकन करेल व त्याचा अहवाल जिल्हा परिषदेसमोर ठेवेल

४. विषय समितीच्या प्रत्येक सभेच्या कार्यवृत्ताची प्रत जिल्हा परिषदेकडे पाठवेल.

५. स्थायी समिती किंवा विषय समितीस, आपल्या सभापतीकडून किंवा जिल्हा परिषदेखालील कोणत्याही अधिका-याकडून किंवा कर्मचा-याकडून कोणतीही माहिती , विवरण, विवरणपत्र, हिशेब किंवा अहवाल मागविता येईल.

६. जिल्हा परिषदे खालील कोणत्याही अधिका-यास किंवा कर्मचा-यास समितीच्या कोणत्याही सभेस हजर राहण्यास सांगण्याचा किंवा संबंधित बाबीवर सल्ला देण्यास सांगण्याचा स्थायी समितीस/ विषय समितीस अधिकार आहे.

स्थायी समितीचे खास अधिकार

नेमून दिलेल्या विषय संबंधीचे वर दिल्याप्रमाणे सर्व अधिकार व कामे करणे आणि शिवाय खालील अधिकारांचा वापर करणे हे स्थायी समितीचे खास अधिकार आहेत.

१. कर बसविणे व वसुल करणे या संबंधी देखरेख ठेवणे.

२. योजनांच्या व बांधकामाच्या अमलबजावणीचे दर नियंत्रीत करणे व त्यात नियतकालीक सुधारणा करणे.

३. जिल्हा निधीच्या गुंतवणुकीची व्यवस्था करणे व नियमन करणे.

४. जिल्हा परिषदेचा मासिक जमा खर्चाचा हिशेब तपासणे व मंजुर करणे.

५. जिल्हा परिषदांतर्गत स्थावर मालमत्ता वा बांधकामे वा विकास योजनांची तपासणी करण्यास कोणत्याही अधिका-यास वा कर्मचा-यास प्राधिकृत करणे.

६. जिल्हा परिषदेच्या कामाच्या प्रगतीचा नियतकालिका आढावा घेणे व जिल्हा परिषदेसमोर तसा अहवाल ठेवणे.

स्थायी समितीचे प्रशासकीय अधिकार

७. कोणत्याही विषय समितीचे कार्यवृत्त मागविणे किंवा तिच्या संबंधीत विषयाची कोणतीही माहिती विवरण हिशेब अहवाल मागविणे

८. मुख्यकार्यकारी अधिकारी यांची एक महिन्यापेक्षा अधिक नाही आणि इतर वर्ग जिल्हा परिषदेमधील वर्ग-१ व वर्ग-२ अधिका-यांना चार महिन्यापेक्षा जास्त काळाची रजा मंजुर करणे.

९. अध्यक्षास व विषय समितीच्या सभापतीस :- तीस दिवसापेक्षा जास्त परंतु ९० दिवसापर्यत अनुपस्थितीची रजा मंजुर करणे.

१०. पंचायत समिती सभापती वा उपसभापतीस :- तीन दिवसापेक्षा जास्त परंतु १८० दिवसापर्यंत अनुपस्थितीची रजा मंजुर करणे.

११. ग्राम पंचायतीचा सदस्य लागोपाठ ६ महिने ग्राम पंचायतीच्या सभेला अनुपस्थितीत असेल किंवा सतत ४ महिने गाव सोडून (सरपंच्याचे परवानगीशिवाय) राहील्यास त्यास अपात्र ठरविण्याचा अधिकार.

गैरवर्तणूक /अफरातफर ईत्यादी प्रकरणी ग्राम पंचायत सरपंच / उपसरपंच यांना पदावरुन दुर करणे.

विषय समितीचा खास अधिकार :-

त्या त्या विषय समितीस ठरवून दिलेल्या विषयांच्या बाबतीत उपलेखाशीर्षाखालील रुपये २५००० पेक्षा जास्त परंतु रुपये १.२५ लाखा पर्यंतच्या पुनर्विनियोजन फंडास संबंधीत विषय समिती मंजुरी देईल.

अर्थ समितीचे खास अधिकार :-

१. जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे जमा खर्चाचे हिशोब तपासणे.

२. जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे वार्षिक उत्पन्नाच्या व खर्चाच्या अंदाजपत्रकाची छाननी करणे आणि जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे उदिष्ट कमी खर्चात व गतीमानरित्या साध्य होतील यादृष्टीने सल्ला देणे.

३. जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे सुधारीत व पूरक अंदाजपत्रकांची छाननी करणे.

४. जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या ऑडीट रिपोर्टची छाननी करणे.

*** स्थायी समिती व विषय समितीचे अर्थ विषयक अधिकार ***

१. विषय समितीस, बांधकामाच्या किंवा विकास योजनेची प्रशासकीय मान्यता अनावर्तीत खर्चाची रक्कम १२,००,०००/- ते १५,००,०००/- पर्यत आणि आवर्ती खर्च रुपये २,००,००० ते ३,००,०,०००/- पेक्षा जास्त असेल तर त्यास मंजुरी देईल. तसेच रुपये १२,००,०००/- ते १५,००,०००/- पर्यत असलेल्या अनावर्ती खर्चाची निविदा स्विकारण्यास मंजुरी देईल.

स्थायी समितीस, बांधकामाच्या किंवा विकास योजनेची प्रशासकीय मान्यता अनावर्तीत खर्चाची रक्कम १३,००,०००/- ते २५,००,०००/- पर्यत आणि आवर्ती खर्च रुपये ३,००,००० ते ५,०० ,०००/- पेक्षा जास्त असेल तर त्यास मंजुरी देईल. तसेच रुपये १३,००,०००/- ते २५,००,०००/- पर्यत असलेल्या अनावर्ती खर्चाची निविदा स्विकारण्यास मंजुरी देईल.

अपिलीय अधिका-याचे नांव	:-	श्री.अमोल भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प. वर्धा
जन माहिती अधिका-याचे नांव	:-	श्रीमती. अलका संजय ठाकरे, प्र.सहाय्यक प्रशासन अधिकारी
सहाय्यक माहिती अधिका-याचे नाव	:-	श्री. मिलींद सितारामजी काळसर्पे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी
पत्ता	:-	सामान्य प्रशासन विभाग, जि.प.वर्धा
विभागाचे नांव	:-	सामान्य प्रशासन विभाग, जि.प.वर्धा
मंत्रालयीन विभाग	:-	ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई.
अहवाल सादर करणा-या अधिका-याचे नांव	:-	(१) शासन स्तर (२) आयुक्त कार्यालय (३) मा.जिल्हाधिकारी

महाराष्ट्र जिल्हा परिषद, व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार जिल्हा परिषद, वर्धाचे सामान्य प्रशासन विभागा अंतर्गत खालील कामे हाताळण्यात येतात.

- वर्ग ३ व ४ चे पदभरतीची कार्यवाही करणे
- जिल्हा परिषद, अंतर्गत घेण्यात येणा-या सभेचे आयोजन करणे व नियंत्रण ठेवणे.
- जिल्हा परिषद, अंतर्गत पदाधिकारी / अधिकारी यांचे वाहनाची आस्थापना.
- वर्ग ३ व वर्ग ४ चे पदोन्नतीबाबत प्रकरणे हाताळणे व सत्कार समारंभ आयोजित करणे.
- आएसओ बाबत कार्यवाही करणे.
- सेवानिवृत्ती प्रकरणे हाताळणे.
- वर्ग ३ व वर्ग ४ चे विभागीय चौकशी तसेच अनाधिकृत गैरहजेरीबाबत प्रकरणे हाताळणे.
- परिषद शाखे संबधीत कामे हाताळणे.
- लोकआयुक्त,मानवाधिकार आयोगाकडील तसेच न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
- लोकशाही दिनी प्राप्त तक्रारीचा आढावा घेणे व नियंत्रण ठेवणे.
- वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिध्द करणे.
- वर्ग ३ व वर्ग ४ चे आंतरजिल्हा बदली तसेच अनुकंपा भरतीबाबत कार्यवाही करणे.
- माहितीचा अधिकार अधिनीयम २००५ अंतर्गत १ ते १७ मॅनुअल प्रसिध्द करणे.
- पंचायत राज पोर्टल.
- चारमाही/आठमाही/अकरामाही अंदाजपत्रक शासनास सादर करणे.
- वर्ग-१/२ ची आस्थापना विषयक सर्व कामे.
- आस्थापना विषयक इतर बाबी.

मॅन्युअल्स क्रमांक २ :-
आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारी व कर्तव्य :-

१. अंमलात असलेल्या कार्यान्वये विशेषरित्या प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करणे.
२. राज्यशासनाने विहीत केलेल्या नियमानुसार जिल्हा परिषदेच्या अधीन असलेल्या सर्व अधिका-यांची व कर्मचा-यांची कर्तव्ये ठरवुन देणे .
३. जिल्हा परिषदेच्या कोणत्याही विषय समितीच्या किंवा पंचायत समितीच्या सभेस हजर राहण्याचा त्यांना अधिकार आहे
४. शासनाच्या नियमान्वये वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवामधील सेवकाची जिल्हा परिषदेच्या सेवेत नेमणुक करण्याचा त्यांना अधिकार आहे.
५. जिल्हा परिषदेच्या सर्व कामाच्या अंमल बजावणीवर देखरेख व नियंत्रण ठेवणे. जिल्हा परिषदेच्या सर्व बांधकामांची व विकास योजनांची जलद अंमलबजावणीसाठी आवश्यक ती उपाय योजना करणे. जिल्हा परिषदेच्या व विषय समित्यांच्या सभेच्या कामकाजाची सर्व कागदपत्रे व दस्तऐवज आपल्या अधिकक्षेत ठेवणे.
६. जिल्हा निधीतुन रकम काढणे व त्याचे संवितरण करणे, जिल्हा परिषदेखालील अधिका-यांवर व कर्मचा-यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
७. जिल्हा परिषदेच्या अर्थविषयक बाबीस जिल्हा परिषदेने विहीत मुदतीत मंजुरी न दिल्यास ते राज्यशासनाकडे पाठविणे
८. जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यास जिल्हा परिषदेने कसूर केल्यास ते राज्यशासनाकडे पाठविणे.

जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखाचे अधिकार व कामे :-

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या बाबतीत तांत्रिक मंजूरी देता येईल.

तो प्रत्येक वर्षी, आपल्या विभागात काम करणा-या वर्ग दोनच्या सेवेतील अधिका-यांच्या कामांचे मूल्यमापन करील आणि त्याबाबतचे आपले मत गोपनीयरीत्या मुख्य कार्यकारी अधिका-याकडे पाठविल.

आजारपणामुळे किंवा इतर वाजवी कारणामुळे प्रतिबंध झाला नसल्यास तो जिल्हा परिषदेच्या सचिव असेल अशा समितीच्या प्रत्येक सभेस उपस्थित राहील आणि त्यास, पीठासीन प्राधिका-याच्या परवानगीने, सभेत ज्या बाबीवर चर्चा चालू असेल तिच्या संबंधात माहिती किंवा स्पष्टीकरण देता येईल.

गट विकास अधिका-याचे अधिकारी व कामे :-

१. गट विकास अधिकारी पंचायत समितीच्या कामाकाजाचे सर्व कागदपत्रे व दस्तऐवज आपल्या ताब्यात (कस्टडी) ठेवेल
२. पंचायत समितीला मिळणा-या अनुदानातुन रकमा काढणे किंवा संवितरीत करणे.
३. पंचायत समितीच्या जमाखर्चाच्या हिशोबाचे विवरण पत्र तयार करुन ते मुख्य कार्यकारी अधिका-याकडे विहीत मुदतीत पाठविणे.
४. अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात पंचायत समितीने कसूर केल्यास ते जिल्हा परिषदेकडे मंजुरीसाठी पाठविणे.
५. गट अनुदानातून हाती घ्यावयाच्या बांधकामाच्या व विकास योजनांच्या संबंधात मालमत्ता संपादन करण्यास किंवा तीची विक्री किंवा हस्तांतरण करण्यास मंजूरी देण्यासाठी राज्यशासन निर्दिष्ट करील त्याप्रमाणे अधिकाराचा वापर करणे

उप अभियंता यांचे अधिकार :-

१. रुपये ५००००/- पर्यतचे कामास तांत्रिक मंजुरी देणे तसेच निविदास स्विकृती देणे.
२. कामावर देखरेख करुन कामे सुस्थितीत करुन घेणे तसेच पुर्ण झालेल्या कामाचे मुल्यांकन करुन अहवाल देणे

कर्मचा-यांचे कर्तव्य :-

१. कार्यसुचीनुसार दिलेली कामे वेळीच पार पाडणे.
२. अधिका-यांनी सोपविलेली कामे जबाबदारीने व नियमानुसार पार पाडणे.

अ क्र	अधिका-याचे नाव	पदनाम	सेवेचा तपशिल
१.	श्री. पराग सोमण, भा.प्र.से.	मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वर्धा	प्रमुख प्रशासकीय अधिकारी - जि.प. अंतर्गत सर्व विभागावर नियंत्रण ठेवून विविध योजनांची अंमल बजावणी करुन घेणे.
२	श्री. सुरज गोहाड	अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वर्धा	समाज कल्याण, बांधकाम, लघुसिंचन, कृषि व पशुसंवर्धन विभागाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे, योजनांची अंमलबजावणी करणे.

सामान्य प्रशासन विभाग, जि. प वर्धा मधिल सेवाविषयक बाबींचा तपशिल

अक्र	टेबल क्रं.	अधि/कर्मचा-याचे नाव	पदनाम	सेवेचा तपशिल
१	-	श्री. अमोल भोसले	उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)	आहरण व संवितरण अधिकारी सामान्य प्रशासन विभागातील कर्मचा-यावर नियंत्रण ठेवणे. जि. प. तथा स्थायी समिती सभेचे सचिव म्हणून कामकाज पाहणे.
२	-	श्री. अलका ठाकरे	प्र. सहाय्यक प्रशासन अधिकारी	कार्यालयीन सुव्यवस्था राखणे व अधिनस्थ कर्मचा-यांवर नियंत्रण ठेवणे.तसेच साप्रवि तथा अन्य विभागातील नस्ती अभिप्रायासह उपमुकाअ (सा.) यांचेकडे सादर करणे.
३	-	श्रीमती अलका संजय ठाकरे	कनिष्ठ प्रशासन अधिकारी	आस्थापना गट अ व ब, सेवानिवृत्ती वर्ग ३ व ४, आस्था-४, लोकआयुक्त, मानवाधिकार आयोग प्रकरणे, आवक जावक, रोखपाल इ. नस्ती अभिप्रायासह सादर करणे व सनियंत्राण् ठेवणे.
४	-	श्री. मिलींद सि.काळसर्पे	कनिष्ठ प्रशासन अधि.	आस्थापना वर्ग ३, कार्या.आस्था, परिषद, लेखा आक्षेप, आय.एस.ओ., मा.अ., न्याया. प्रकरण, बजेट इ.नस्तीवर अभिप्राय नोंदवून कामावर सनियंत्रण ठेवणे
५	-	सौ. सुनिता शंभरकर	लघुलेखक (उ श्रे)	मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक असुन मा. अति. मु. का.अ. यांनी दिलेल्या निर्देशानुसार काम करणे.
६	-	श्री. पी. टी. चांभारे	लघुलेखक (नि श्रे)	उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचे स्वीय सहाय्यक असुन सभेचे कार्यवृत्त लिहिणे, उप मु. का.अ. यांनी दिलेल्या निर्देशानुसार काम करणे.
७	-	श्री.आशिष कांबळे	लघुलेखक (नि श्रे)	उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचे स्वीय सहाय्यक असुन सभेचे कार्यवृत्त लिहिणे, तसेच उप मु. का.अ. यांनी दिलेल्या निर्देशानुसार काम करणे
८	-	श्री. सी. पी. कांबळे	लघुलेखक (उ श्रे)	मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक असुन त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार काम करणे
९	-	श्री. प्रंशात वाटाणे	वि.अ. (सां.)	जि.प. चा वार्षिक प्रशासन अहवाल , आढावा सभांच्या टिपण्या, यशवंत पंचायत राज अभियान.
१०	आस्था-१	कु. सिध्दी सरोदे	कनिष्ठ सहा.	आस्थापना विषयक बाबी वर्ग-३ कर्मचारी यांचेशी संबधीत सर्व कामे.
११	आस्था-२	श्री. प्रणय उईके	कनिष्ठ सहा.	आस्थापना विषयक बाबी वर्ग-४ कर्मचारी यांचेशी संबधीत सर्व कामे
१२	आस्था-३ (अ) व (ब)	श्री. अरुन कथले	वरिष्ठ सहा.	आस्थापना विषयक बाबी वर्ग १ व २
१३	आस्था-४	श्री. सुरज अ. देशमुख	कनिष्ठ सहा.	लेखा आक्षेप तथा आयुक्तांचे निरीक्षण, मा.मु.का.अ. यांचे निरिक्षण, ISO बाबत नस्ती

				हाताळणे, सात दिवसावरील प्रलंबित प्रकरणाचा अहवाल, नागरिकांची सनद, सेवाविषयक बाबीचा अहवाल. माहितीचा अधिकार
१४	आस्था-५	कु. ममता वसंतराव सयाम	वरिष्ठ सहाय्यक	साप्रवि व पंचायत विभागातील वर्ग ३ व ४ च्या कर्मचा-यांची आस्थापना सांभाळणे, वेतन देयके, प्रवासभत्ता देयके अतिकालिक भत्ता देयके, वै.प्र.देयके तयार करणे, वेतन निश्चिती, . धान्य अग्रीम अनुदान वाटप, घरबांधणी अग्रीम.
१५	आस्था-६	श्री. मोहम्मद व.सत्तार शेख	कनिष्ठ सहा.	अनुकंपा प्रकरण, आंतर जिल्हा बदली, भनिनि. प्रकरणे, सेवार्थ प्रणालीचे साप्रवि, चे काम,
१६	आस्था-७	श्री. शालिनी सलामे	कनिष्ठ सहाय्यक	लिपीक वर्गीय सर्व प्रकारची सेवानिवृत्ती प्रकरणे, सेनि. कर्मचा-यांचे अंतीम भनिनि. प्रकरणे, अशंराशीकरण प्रकरणे, गटविमा योजना प्रकरणे, अर्जित रजा रोखीकरण प्रकरणे,
१७	आस्था-८	श्री. श्रीकांत धोटे	वरिष्ठ सहाय्यक	अनधिकृत गैरहजर कर्मचारी व विभागीय चौकशी प्रकरणे, लोकआयुक्त मानवाधिकार आयोग ई. प्रकरणे हाताळणे.
१८	आस्था-०९	कु. सुनिता जाधव	वरिष्ठ सहा.	अनुदान शाखा, वर्ग ३ व ४ अनुदान वितरण व वर्ग-१ व २ दौरा दैनंदिनी,वैद्यकीप्रतिपुर्ती देयक, बजेट , वर्ग-४ गणवेश निधी, वर्ग-३व ४ कर्मचारी यांची रजा प्रकरणे.
१९	आस्था-१०	श्री. आशिष सोळंके	कनिष्ठ सहा.(ले)	रोखीचे व्यवहार सांभाळणे, संगणक
२०	आस्था-११	श्री. अमोल व्हि. राऊत	कनिष्ठ सहा.	जि.प.सभेचे व स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त भाग-१ नमुना क मध्ये लिहिणे, जि.प.सदस्य यांचे प्र.भ.दे. तयार करणे, जि.प. बचत भवन हॉल / सुट / सभागृह किरायाने देणेबाबत, अध्यक्ष, उपाध्यक्ष निवासस्थान देयक व विज बिल देयक तयार करणे.
२१	आस्था-१२	श्री. शिरीष वानखेडे	कनिष्ठ सहाय्यक	पदाधिकारी यांचे अधिनस्थ वाहनाची देयके तयार करणे, वाहनाची दुरुस्तीबाबत नस्त्या सादर करणे, वाहन निर्लेखित करुन नविन वाहन खरेदी करणे, वाहनाच्या रु. ३०००/- च्या वरील खर्चास मंजुरी घेणे
२२	आस्था-१३	श्रीमती शुभदा पाचखेडे	वरिष्ठ सहा.	न्यायालयीन प्रकरणे, लोकशाही दिन, गोपनिय अहवाल,लोकआयुक्त प्रकरणे.
२३	आस्था-१४	श्री.विलास क्षीरसागर	कनिष्ठ सहा.	आवक विभाग
२४	आस्था-१५	श्री. रवि उपाध्याय	कनिष्ठ .	जावक विभाग

मॅन्युअल्स क्रमांक ३ :-
निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली

अ. क्र	काय प्रसिध्द करणार	कालावधी	कुठे प्रसिध्द करणार	शेरा
१	सामान्य प्रशासन विभागाची रचना व कार्य	१० दिवस	जिल्हास्तरावर सुचना फलक	
२	१. सर्व साधारणपणे जि.प.चे प्रशासकीय नियंत्रण, वर्ग ३ व ४ च्या नियुक्त्या, पदोन्नती, (रिक्त पदांची संख्या)	६ महिने	जिल्हास्तरावर सुचना फलक	रिक्त पदे भरण्यासाठी माहिती वर्तमान पत्रात प्रसिध्द केली जाते
३	स्थायी समिती सभा जि.प. सभा	३० दिवस ९० दिवस	जिल्हास्तरावर सुचना फलक	
४	सर्वसाधारण बदल्या	दरवर्षी माहे ३१ मे अखेर-पर्यंत	जिल्हास्तरावर सुचना फलक	दर वर्षी १ आक्टोबर प्रसिध्द करणे
५	सेवा जेष्ठता यादया १ जानेवारी	दरवषी एप्रिल मध्ये	जिल्हास्तरावर सुचना फलक	दरवर्षी ३० एप्रिल पर्यंत
६	से.नि. प्रकरणे (यादी जाहीर करणे)	दरमहा	जिल्हास्तर	
७	पं.स. वार्षिक तपासणी/ मा. आयुक्त तपासणी	३० दिवस	पंचायत समिती स्तरावर	
८	१)उप मु.का.अ.(सा.) यांचे अधिनस्त कर्मचा-यांची बाबनिहाय कर्तव्य सुची.	१० दिवस	जिल्हास्तर सूचना फलक	
९	माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांचे नांव व हुद्या फलक लावणे	--	कार्यालयातील दर्शनीय ठिकाण	
१०	आस्थापनाविषयक नविन शासन निर्णय प्रसिध्द करणे	वेळोवेळी	जि.प./प.स. कार्यालयातील फलकावर	सर्व संबंधितांना पृष्ठांकीत करुन पाठविले जाते.

मॅन्युअल्स क्रमांक ४ :-
स्वत: कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके

अ) जिल्हा परिषद व पंचायत समिती मध्ये कार्यरत अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांना मुख्यत्वे खालील उद्देशासाठी **दौरे व रात्रीचे मुक्काम** शासनाने निर्धारित करुन दिलेले आहेत.

१. कार्यक्षेत्रात हाती घेण्यांत आलेल्या विविध विकासाच्या कामाचा आढावा घेणे व जेथे कामाची प्रगती समाधानकारक नाही किंवा प्रत्यक्ष जागेवर काही अडचणी निर्माण झाल्या असल्यास त्याचे निराकरण करणे.

१. अधिनस्त क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी नेमून दिलेली कामे व कर्तव्ये समाधानकारकपणे पार पाडतात कि नाही याची तपासणी करणे.

२. क्षेत्रीय कार्यालयात व प्रकल्पस्थानी प्रशासकिय कामकाज, वित्तीय व लेखा विषयक बाबी शासनाने नेमून दिलेल्या नियमानुसार होतात की नाही याची पाहणी करणे.

जिल्हा परिषदेमार्फत शासकीय व स्थानिक स्वरुपाच्या योजनेचा प्रसार स्थानिक लोकांशी संपर्क साधून करणे. स्थानिक लोक व लोकप्रतिनिधी यांचा विविध विकासाच्या योजना कार्यान्वित करण्यासाठी सहयोग मिळविणे

४.वरील उद्देश साध्य करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी खालील प्रमाणात दौरे व रात्रीचे मुक्काम विहीत केलेले आहेत.

अ क्र	पदनाम	वर्षातून करावयाचे दौऱ्याचे दिवस	पैकी वर्षातून करावयाच्या रात्रीच्या मुक्कामाचे दिवस
१	मुख्य कार्यकारी अधिकारी	१२०	७२
२	अति. मुख्य कार्यकारी अधिकारी	१२०	७२
३	उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)	६०	२४

मॅन्युअल्स क्रमांक ५ :-

त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सुचना, नियमपुस्तीका आणि अभिलेख

जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असलेले कर्मचारी खालील नियम पुस्तीकांचा आधार घेऊन शासकिय कामकाज पार पाडीत आहेत.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१
२. मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८
३. महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता १९६८
४. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१
५. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१
६. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१
७. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१
८. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८१
९. महाराष्ट्र नागरी सेवा(मानधन, फी, स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता)नियम १९८१
१०. महाराष्ट्र नागरी सेवा (शासकिय निवासस्थानाचा ताबा) नियम १९८१
११. महाराष्ट्र नागरी सेवा (प्रवास भत्ता) नियम १९८१
१२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा वपंचायत समित्या (अंदाजपत्रक) नियम १९६६
१३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (निधीचे पुनर्विनियोजन) नियम १९७१
१४. जिल्हा परिषदा आकस्मिक खर्चाबाबतचे नियम
१५. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९६६
१६. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा नियम १९६८
१७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७
१८. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४

याशिवाय शासनाच्या विविध विभागाकडून प्रसिध्द करण्यांत आलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक व पत्रांमधील मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करुन कामांचा निपटारा करण्यांत येतो.

नियम: महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम २७४ (१) नुसार राज्य शासनास या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनाकरीता या अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत नसतील असे नियम करता येतील.

विनियम:- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम २७५ नुसार जिल्हा परिषदेस वेळोवेळी या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी व राज्य शासनाने केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील.

उपविधी:- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम २७६ (१) नुसार जिल्हा परिषदेस या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरीता या अधिनियमाशी विसंगत नसतील असे उपविधी वेळोवेळी तयार करता येतील, त्यात फेरबदल करता येतील किंवा ते विखंडीत करता येतील आणि पुर्वगामी तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा उप-विधीत तरतुदी करता येतील.

मॅन्युअल्स क्रमांक 6 :-

त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गांचे विवरण

कार्यालयीन कामकाजात खालील प्रमाणे 6 संच पध्दतीचा वापर केला जातो.

१. कार्यविवरण पंजी / प्रलंबीत पत्रे
२. प्रतिक्षाधिन प्रकरणे
३. नियतकालीके अ व ब
४. स्थायी आदेश नस्ती
५. अभिलेखागारात पाठवावयाच्या नस्त्या
६. ड वर्गीय कागदपत्रे

१. **कार्यविवरण पंजी / प्रलंबीत पत्रे-**

प्रत्येक लिपिकाकडून प्रपत्र 6 मध्ये कार्यविवरण पंजी ठेवली जाणे आवश्यक आहे. या नोंदवहीत दैनदिन टपालाची नोंद घ्यावयाची असून प्रकरणाचा निपटारा झाल्यानंतर कार्यविवरण पंजीमधील पत्राचा अनुक्रमांक गोलांकीत करावा. तसेच प्रकरण निकाली काढले किंवा ते जावक करण्यासाठी पाठविले असेल तर स्तंभ 4 मध्ये ते निकाली काढल्याची नोंद घ्यावी. कार्यविवरण पंजीमध्ये दर आढवडयाचा गोषवारा काढून प्रभारी अधिकारी यांचे सामोर ठेवावा.

2. **प्रतिक्षाधिन प्रकरणे**

या पंजीमध्ये वरिष्ठ कार्यालयाकडून माहिती येणे प्रलंबीत आहे व प्रकरण निकाली निघु शकत नाही अशी प्रकरणे प्रतिक्षाधीन पंजीत नोंदविण्यांत यावी. या पंजीमुळे कर्मचाऱ्यांना त्वरीत अहवाल मागविण्याकरीता व प्रलंबीत पत्रावर नियंत्रण ठेवण्याकरीता त्याचप्रमाणे प्रकरणात वेळोवेळी स्मरणपत्रे देण्याकरीता ही पंजी उपयुक्त ठरते

3. **नियतकालीके अ व ब**

या पंजीच्या भाग अ मध्ये (पंधरवाडी / मासीक / त्रैमासीक / सहामाही / वार्षिक) अहवाल ज्या पत्रान्वये विहीत करण्यांत आलेला आहे व ज्या कार्यालयास असा अहवाल ज्या नियत दिनांकास सादर करावयाचा आहे त्याची पत्र क्रमाक व

